## निशाणी क्र. २१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, वादीने प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादीने अर्जात येणेप्रमाणे दावा दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे–

अ) प्रस्तुत दावा टंकलिखित करताना टंकलेखन चुकीमुळे, हस्तदोषामुळे दावा परिच्छेद क्र. १क(I) मध्ये गट नं. १४३/१/अ पैकी क्षेत्र ०० हे ६० आर, आकार ०० रु ९० पैसे इत्यादी मजकूर चुकीचा समाविष्ट झाला आहे. त्यामुळे सदर मिळकत प्रस्तुत दाव्यातून वगळण्यास व तशी दुरुस्ती करावी अशी विनंती केली आहे.

ब) दाव्यामध्ये मौजे वेणेगाव ता. माढा येथील गट नं. १४२/१/ब/२ व १४२/१/अ या दोन्ही मिळकती दावा मिळकत म्हणून समाविष्ट केलेल्या आहेत. परंतु, गट नं. १४२/१/ब/२ चे खातेधारक उमेश दत्तात्रय जगताप व गट नं. १४२/१/अ चे खातेधारक दिनेश दत्तात्रय जगताप यांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याची राहून गेले असून त्यांना सदर दावेकामी अनुक्रमे प्रतिवादी क्र. ९ व १० म्हणून समाविष्ट करुन तशी दुरुस्ती करावयाची आहे. तसेच, दावा परिच्छेद क्र. १०(ब) नंतर नवीन परिच्छेद क्र. १०(ब१) व दावा परिच्छेद क्र. १०(ब१) नंतर नवीन परिच्छेद क्र. १०(ब२) असे लिहून प्रस्तुत अर्जात नमूद परिच्छेद क्र. ३ व ४ मधील नमूद मजकूर नव्याने समाविष्ट करावयाचा आहे. तसेच, दाव्यामध्ये परिच्छेद क्र. ३ मध्ये पान नंबर ७ वर ओळ नंबर १३ मध्ये प्रतिवादी प्रतिवादी असे दोनवेळा अनावश्यक नमूद झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी म्हणून एका जागेवर काट मारुन तशी दुरुस्ती करावयाची आहे. वादीचे पुढील कथन की, सदर दुरुस्तीमुळे दाव्यातील मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच, सुचित दुरुस्ती केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही असे कथन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ व ७ यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ व ७ यांनी प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा असून वादीस सदर दुरुस्ती मागण्याचा अधिकारी नाही असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील दाखल केलेले प्रतिवादी यांचे म्हणणे तसेच दाखल कागदपत्र याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी वादीने दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्यामध्ये अर्जातील कथनाप्रमाणे दावा मिळकत गट नं. १४३/१/अ वगळण्याची विनंती केली आहे, सुचित प्रतिवादी क्र. ९ व १० यांना समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने दावा मिळकतीच्या सातबारा उता–याचे अवलोकन केले असता सदर सुचित प्रतिवादी यांचे नाव दावा मिळकत गट नं. १४२/१/ब/२ चे खातेधारक उमेश दत्तात्रय जगताप व गट नं. १४२/१/अ चे खातेधारक दिनेश दत्तात्रय जगताप यांचे सातबारा उता–यावर नमूद असल्याचे दिसून येते. सदर सुचित प्रतिवादी यांना अर्जाची नोटीस मिळून सुध्दा ते हजर झाले नाहीत आणि त्यांचे म्हणणे सादर केले नाही. सदर दावा हा दावा मिळकतीच्या वाटपासंबंधीचा असल्याने दाव्याचा न्यायनिर्णय सदर सुचित प्रतिवादींवर बंधनकारक असणार आहे. त्यामुळे, सदर सुचित प्रतिवादी दाव्यात आवश्यक पक्षकार होतात असे दिसून येते. तसेच, अर्जात नमूद दुरुस्ती दाव्यात नव्याने केल्यास प्रतिवादी यांचे कुठलेही नुकसान होत नाही तसेच दाव्याचे स्वरुपात बदल होत नाही असे दिसून येते. वादीने प्रस्तुत दावा दि. १२/०७/२०२४ रोजी दाखल केला असून सदरचा अर्ज वादीने दि. २७/०६/२०२५ रोजी दाखल केला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेऊन अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | सदरचा अर्ज वादीने प्रत्येकी प्रतिवादी क्र. १ ते ४ व ७ यांना खर्च रक्कम रुपये ५००/– एकूण रक्कम रु. २,०००/– देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो. |
| २ | वादीने वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर वादीस अर्जात नमूद सुचित दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. |
| ३ | वादीने सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्ती दावा प्रत अभिलेखावर सादर करावी. |

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.04.17 17:44:27 +0530

दिनांक – १७/०४/२०२६

(**अनय ज्ञा. कुलकर्णी**)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 17/04/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 17/04/2026 |